# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.01.2026** **वारःगुरुवार**

---

1. दहशतवादाविरोधात शून्य-सहिष्णुता दृष्टिकोन बाळगण्याचा भारत आणि इस्रायलचा पुनरुच्चार
2. जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यासाठी केंद्र सरकारची अधिसूचना जारी
3. वर्तमान आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज
4. छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात 26 नक्षलवाद्यांची शरणागती
5. खेलो इंडिया बीच स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या कबड्डी संघाची उपांत्य फेरीत मजल आणि
6. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांचं काल निधन

**<u>भारत-इस्रायल</u>**

भारत आणि इस्रायलनं दहशतवादाविरोधात शून्य-सहिष्णुता दृष्टिकोन बाळगण्याचा पुनरुच्चार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी काल दूरध्वनीवरून चर्चा केली आणि भारत-इस्रायल यांच्यातील सामरिक भागीदारी आणखी सक्षम करण्याविषयी विचारविनिमय केला. या संभाषणादरम्यान, दोन्ही नेत्यांनी सामायिक लोकशाही मूल्यं, परस्पर विश्वास आणि दूरदृष्टीच्या आधारावर भारत-इस्रायल सामरिक भागीदारी आणखी भक्कम करण्यासाठी सामायिक प्राधान्यक्रम निश्चित केले. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि दोन्ही देशांतील लोकांना शांतता आणि समृद्धीसाठी सदिच्छा दिल्या.

**<u>जयशंकर</u>**

जग एका मोठ्या स्थित्यंतराच्या प्रक्रियेतून जात असून जगभरात अनेक व्यापक घडामोडी घडल्या आहेत, या घडामोडी जागतिक व्यवस्थेलाच नव्यानं परिभाषित करू शकतात, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉकटर एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल भारत-वायमार स्वरूप बैठकीत बोलत होते. या बैठकीत फ्रान्स, जर्मनी आणि पोलंडच्या परराष्ट्र मंत्र्यांनीही सहभाग घेतला होता. या बैठकीतील चर्चा प्रामुख्याने भारत-युरोपियन संघ संबंध, भारत-प्रशांत आणि युक्रेन संघर्षावर केंद्रित होती, असं जयशंकर यांनी सांगितलं. दरम्यान, परस्पर संबंध दृढ करण्यासाठी सातत्यानं संवाद साधणं हा एक महत्त्वाचा भाग आहे, असं मत डॉक्टर जयशंकर यांनी फ्रान्सचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जॉ-नोएल बॅरो यांच्यासोबतच्या बैठकीत बोलताना सांगितलं.

**<u>जनगणना</u>**

केंद्र सरकारनं जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. या वर्षी 1 एप्रिल ते 30 सप्टेंबर या कालावधीत देशातील सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये घरांची गणना करण्यात येईल. तर दुसरा टप्पा फेब्रुवारी 2027 मध्ये लोकसंख्या गणनेचा असेल. डिजिटल माध्यमांद्वारे केली जाणारी ही देशातील पहिली जनगणना असेल, यामध्ये अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही प्रकरच्या मोबाइलद्वारे ॲप्लिकेशन्सचा वापर करून माहिती संकलित केली जाईल.

**<u>दिल्ली पोलिस</u>**

बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांना ओळखण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी एक विशेष पडताळणी मोहीम राबवली आहे. या कारवाई दरम्यान दिल्ली पोलिसांनी मंगोलपुरी रेल्वे लाईन परिसरातून व्हिसाची मुदत संपल्यानंतरही भारतात वास्तव्य करणाऱ्या पाच जणांना अटक केली आहे. या पाचही जणांना परदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाच्या समन्वयानं बांगलादेशमध्ये परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

**महामार्ग-गडकरी**

उत्तराखंडमधील पौरी इथल्या राष्ट्रीय महामार्ग-534 च्या दुगड्डा ते गुमखाल विभागाच्या उन्नतीकरणासाठी सरकारनं 390 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मंजूर केला आहे असं रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी समाजमध्यमावरील संदेशात सांगितलं आहे. या प्रकल्पांतर्गत 18 किलोमीटर लांबीच्या विभागाचा दुपदरी रस्ता विकसित केला जाणार असून उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश यांच्यातील संपर्कव्यवस्था सुधारणं हा या रस्ते प्रकल्पाचा उद्देश आहे, असं गडकरी यांनी म्हटलं आहे.

**तामिळनाडू**

तामिळनाडूतल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पट्टाळी मक्कल काची अर्थात पीएमके पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी झाला आहे. एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडप्पाडी पलानीस्वामी यांनी चेन्नईमध्ये पीएमकेचे प्रमुख अंबुमणी रामदास यांच्या उपस्थितीत एका पत्रकार परिषदेत याबाबत घोषणा केली.

**भाजप-नड्डा**

पश्चिम बंगालमधल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप अध्यक्ष जे.पी.नड्डा आजपासून दोन दिवसांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यावर गेले आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते पक्षाच्या पश्चिम बंगाल विभागाच्या गाभा समितीची बैठक घेतील तसंच जिल्हास्तरीय पक्ष नेत्यांशी संवाद साधतील. तर उद्या, केंद्रीय मंत्रालयाशी संबंधित अधिकृत बैठकांना जे.पी.नड्डा उपस्थित राहणार आहेत.

**आर्थिक वृद्धीदर**

वर्तमान आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज केंद्र सरकारनं वर्तवला आहे. मागील वर्षी हा दर साडेसहा टक्के होता. वर्तमान आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पन्न 201 लाख कोटी रुपयांहून जास्त होण्याची शक्यता आहे. या आर्थिक वर्षात प्रसारण क्षेत्राशी संबंधित व्यापार, हॉटेल्स, वाहतूक, दळणवळण आणि सेवांमध्ये 7 पूर्णांक 5 दशांश टक्के वाढ होण्याचा अंदाज असून दुय्यम क्षेत्रातील उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रात 7 टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे.

**रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं नियामक आवश्यकतांचे पालन न केल्याबद्दल देशातल्या 35 बँकेतर वित्तीय कंपन्यांची नोंदणी प्रमाणपत्रं रद्द केली आहेत. त्यामुळं आता या कंपन्यांना बँकेतर वित्तीय संस्थांचा व्यवसाय करण्याची परवानगी नाही. नागरिकांनी कोणत्याही आर्थिक व्यवहारांमध्ये सहभागी होण्यापूर्वी संबंधित वित्तीय संस्थांची नियामक स्थिती पडताळून पाहावी असं आवाहन आरबीआयनं केलं आहे.

**नक्षल-आत्मसमर्पण**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात काल 26 नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. यातल्या 13 जणांवर एकंदर 65 लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगडच्या पुनर्वसन योजनेअंतर्गत या नक्षलवाद्यांनी पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करल्याचं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. ओडिशा आणि आंध्रप्रदेशातल्या अनेक कारवायांमधे त्यांचा सहभाग होता. या सर्वांना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत देण्यात आली.

**नागालँड**

रोजगार आणि उपजीविका अभियान जी-रॅम-जी कायदा म्हणजे न्याय्य आणि समृद्ध देश घडवण्याच्या 'विकसित भारत 2027' अभियानाचा हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, असं मत भाजपचे नागालँडचे प्रदेश सरचिटणीस सुनेप सी. जमीर यांनी म्हटलं आहे. ते काल नागालँडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. पूर्वीची मनरेगा योजना विखुरलेली होती आणि त्यात

स्पष्ट ध्येयाचा अभाव होता, असं सांगत या योजनेचं नवीन विधेयक अधिक सुव्यवस्थित असून ते पाणी सुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविका सहाय्य आणि हवामान लवचिकता या चार प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करेल, असंही सुनेप सी. जमीर यांनी सांगितलं.

**<u>तेलंगण- ड्रोन</u>**

मकर संक्रांती सणाच्या काळात आंतरराष्ट्रीय पतंग आणि मिठाई महोत्सवासोबतच तेलंगणा सरकारनं भव्य ड्रोन आणि हॉट एअर बलून शो चं आयोजन करणार आहे. यावर्षी हे कार्यक्रम हैदराबादमधल्या अनेक ठिकाणी आयोजित केले जातील. 16 आणि 17 जानेवारीला गाचीबोवली स्टेडियमवर होणाऱ्या ड्रोन शोमध्ये खेळ, तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा संगम पाहायला मिळेल, असं राज्याचे पर्यटन मंत्री जे. कृष्णा राव यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं. या शोमध्ये हवाई ड्रोन शर्यत, हवेत ड्रोन फुटबॉलचा खेळ आणि तेलंगणातील प्रमुख पर्यटन स्थळांचे दृकश्राव्य सादरीकरण यांचा समावेश असणार आहे.

**<u>निधन</u>**

माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते कबिंद्र पुरकायस्थ यांचे काल दुपारी आसाममधल्या सिलचर इथं वयाच्या 94 व्या वर्षी निधन झालं. पुरकायस्थ हे भाजपच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात विविध संघटनात्मक पदांवर त्यांनी काम केलं. 1991 मध्ये सिलचर लोकसभा मतदारसंघातून ते पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये दूरसंचार राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं.

**<u>राष्ट्रपती-शोक</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. कबिंद्र पुरकायस्थ यांनी समर्पण आणि सचोटीनं लोकांची सेवा केली आणि आसामच्या प्रगतीसाठी सातत्यानं काम केलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>माधव गाडगीळ-निधन</u>**

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात निधन झाले. ते 83 वर्षांचे होते. भारतभरातील पर्यावरण चळवळीला वैज्ञानिक दिशा त्यांनी दिली. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी गाडगीळ यांनी आयुष्य वेचलं. पश्चिम घाटाच्या जैवविविधतेवरील त्यांचं संशोधन अतिशय महत्वाचं ठरलं. 2011 मध्ये त्यावर अहवाल सादर करुन या घाटांमधील अनिर्बंध बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्प भविष्यात विनाशकारी ठरतील, असा स्पष्ट इशारा दिला होता. त्यांच्या निधनानं सर्वच क्षेत्रामधून हळहळ व्यक्त होत आहे.

**<u>खेलो इंडिया</u>**

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धामध्ये काल महाराष्ट्राच्या कबड्डी संघानं विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत मजल मारली. साखळीतील दुसऱ्या लढतीत महाराष्ट्रानं उत्तराखंडचा पराभव केला. बीच सॉकरमध्येही महाराष्ट्राच्या पुरूष संघाने अरूणाचल प्रदेशचा पराभव करीत विजयी आरंभ केला. महाराष्ट्राची दुसरी लढत हिमाचल प्रदेशविरूध्द रंगणार आहे. दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर या स्पर्धा सुरू आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.